# आरोग्य विद्यापीठात डिजिटल हेल्थ अभ्यासक्रम सुरू

**नाशिक ।** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे 'चक्र' व कोयटा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सर्टीफिकेट कोर्स इन डिजिटल हेल्थ' अभ्यासक्रमाचे उद्घाटन दूरस्थ पध्दतीने कुलगुरू ले. जनरल माधुरी कानिटकर यांच्या हस्ते झाले.

यावेळी प्रति-कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, नॅशनल ॲक्रिडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल अँड हेल्थकेअर प्रोव्हाडर्सचे सुरभी गोयल, निशांत मेंधे, चिन्मय अटले, अविनाश पांडे, आय.आय.टी. मुंबईचे डॉ. रंजीत पंडिहान्तेरी यांनी, सुबोध मुळगुंद, डॉ. अक्षेषा तावडे, मधुरा भोसले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाच्या कुलगुरू कानिटकर यांनी सांगितले की, डिजिटल हेल्थच्या माध्यमातून तंत्रज्ञानाच्या नव्या पर्वाला प्रारंभ झाला आहे. विद्यापीठाने कोइटा फाऊंडेशनच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेला हा अभ्यासक्रम आरोग्य शिक्षणातील विद्यार्थ्यांकरीता अत्यंत महत्वपूर्ण असणार आहे. केंद्र सरकारच्या 'विकसित भारत'च्या धर्तीवर संशोधन आणि तंत्रज्ञानाचा मेळ घालण्यात आला आहे. या अभ्यासक्रमामुळे डॉक्टर्स आणि आरोग्य क्षेत्रात कार्यरत तज्ज्ञांमध्ये डिजिटल साक्षरता वाढेल आणि ते तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करू शकतील. विद्यापीठाचा डिजिटल हेल्थ अभ्यासक्रमाला इतर विद्यापीठासाठी आदर्श असेल, असेही त्यांनी सांगितले. भविष्यातील वैद्यकीय क्षेत्र हे पूर्णपणे डिजिटल असेल. त्यामुळे आपल्या तरुण डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांना डिजिटल हेल्थचे महत्त्व समजावून सांगणारा अभ्यासक्रम असणे ही काळाची गरज आहे. डिजिटल हेल्थ म्हणजे केवळ डेटा एन्ट्रीचे काम नसून, ती एक स्वयंचलित प्रक्रिया आहे जी विविध ठिकाणांहून आरोग्यविषयक माहिती गोळा करुन आरोग्यसेवा वृध्दींगत करण्यास मदत होईल. या अभ्यासक्रमात डिजिटल टेक्नोलॉजी, हॉस्पिटल मॅनेजमेंट, भविष्यात उद्‌भवणारे आजार, ए.आय. चा प्रभावी वापर याचा समावेश करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमामुळे डॉक्टर आणि विद्यार्थी डिजिटल युगासाठी सज्ज होतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी कोयटा फाऊंडेशनच्या चिफ ऑपरेटिंग ऑफिसर गोयल, एन.ए.बी.एच.चे सीनिअर मॅनेजर निशांत में उपस्थित होते. एन.ए.बी.एच. येथील डिजिटल हेल्थचे ग्रुप लिडर अविनाश पांडे, विद्यापीठाच्या 'चक्र'चे प्रभारी मुख्य प्रशासकीय अधिकारी ब्रिग. सुबोध मुळगुंद, डॉ. अक्षेषा तावडे, डॉ. सानिया भालेराव यांनी कार्यक्रमाचे समन्वयन केले.

# विद्यापीठात डिजिटल हेल्थ अभ्यासक्रम

## आरोग्य शिक्षणात अभ्यासक्रम महत्त्वपूर्ण ठरणार

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ४ : आरोग्य शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाचा डिजिटल हेल्थ अभ्यासक्रम महत्त्वपूर्ण ठरेल, असे प्रतिपादन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल (निवृत्त) डॉ. माधुरी कानिटकर यांनी केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे 'चक्र' आणि कोयटा फाउंडेशनतर्फे 'सर्टिफिकेट कोर्स इन डिजिटल हेल्थ' अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन दूरस्थ पद्धतीने झाले. या वेळी कुलगुरू डॉ. कानिटकर बोलत होत्या.

प्रति-कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, नॅशनल एक्रिडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल ॲन्ड हेल्थकेअर प्रोव्हाइडर्सचे सुरभी गोयल, निशांत मेंधे, चिन्मय अटले, अविनाश पांडे, आयआयटी, पवईचे डॉ. रंजित पंडिहान्तेरी, सुबोध मुळगुंद, डॉ. अश्लेषा तावडे, मधुरा भोसले आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. कानिटकर म्हणाल्या, की 'डिजिटल हेल्थ'च्या माध्यमातून तंत्रज्ञानाच्या नव्या पर्वाला प्रारंभ झाला आहे. विद्यापीठाने कोइटा फाउंडेशनच्या सहकार्याने विकसित केलेला हा अभ्यासक्रम आरोग्य शिक्षणातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण असेल. केंद्र सरकारच्या 'विकसित भारत'च्या धर्तीवर संशोधन आणि तंत्रज्ञानाचा मेळ घातला आहे. या अभ्यासक्रमामुळे डॉक्टर आणि आरोग्य क्षेत्रात कार्यरत तज्ज्ञांमध्ये डिजिटल साक्षरता वाढेल. ते तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करतील.

विद्यापीठाचा डिजिटल हेल्थ अभ्यासक्रम इतर विद्यापीठांसाठी आदर्श असेल. भविष्यातील वैद्यकीय क्षेत्र पूर्णपणे डिजिटल असेल. त्यामुळे आपल्या तरुण डॉक्टरांना आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना डिजिटल हेल्थचे महत्त्व समजावून सांगणारा अभ्यासक्रम असणे ही काळाची गरज आहे. डिजिटल हेल्थ केवळ डेटा एंट्रीचे काम नसून, ती स्वयंचलित प्रक्रिया आहे. विविध ठिकाणांहून आरोग्यविषयक माहिती गोळा करून आरोग्यसेवा वृद्धिंगत करण्यास मदत होईल. अभ्यासक्रमात डिजिटल तंत्रज्ञान, रुग्णालय व्यवस्थापन, भविष्यात उद्भवणारे आजार, 'एआय'चा प्रभावी वापराचा समावेश केला आहे. या अभ्यासक्रमामुळे डॉक्टर, विद्यार्थी डिजिटल युगासाठी सज्ज होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कोयटा फाउंडेशनच्या मुख्य संचालन अधिकारी गोयल म्हणाल्या, की डिजिटल हेल्थ अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होतील. आरोग्य व तंत्रज्ञानाच्या संगमातून तयार केलेला अभ्यासक्रम गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. याद्वारे रुग्ण व डॉक्टर संवाद कौशल्य विकसित करण्यात येतील. डेटा सायन्स, डिजिटल टूल व जागतिक आरोग्यविषयक आव्हाने यांचा अभ्यासक्रमात प्राधान्याने समावेश केला आहे. 'एनएबीएच'चे वरिष्ठ व्यवस्थापक निशांत मेंधे म्हणाले, की डिजिटल हेल्थ आरोग्य विद्यापीठाने डिजिटल आरोग्य शिक्षणाच्या क्षेत्रात टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. अविनाश पांडे म्हणाले, की डिजिटल हेल्थ आपल्या देशात यंत्रणा विकसित करणे गरजेचे आहे. त्यासाठी विद्यापीठाने सुरू केलेला अभ्यासक्रम उल्लेखनीय आहे. विद्यापीठाच्या सर्टिफिकेट इन डिजिटल हेल्थ अभ्यासक्रमाच्या उद्‌घाटनासाठी विद्यापीठाच्या 'चक्र'चे प्रभारी मुख्य प्रशासकीय अधिकारी सुबोध मुळगुंद, डॉ. अश्लेषा तावडे, डॉ. सानिया भालेराव यांनी समन्वय केले.

# आरोग्याची डिजिटल माहिती, संशोधकांसाठी ठरणार उपयुक्त

## आरोग्य विद्यापीठाद्वारे डिजिटल हेल्थ प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**प्रतिनिधी** | नाशिक

भविष्यातील डिजिटलायझेशनचा विचार करुन आरोग्य शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता आरोग्य विज्ञान विद्यापीठाने डिजिटल हेल्थ प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु केला आहे. यातून केवळ डेटा एन्ट्रीचे काम होणार नसून, ती एक स्वयंचलित प्रक्रिया आहे. जी विविध ठिकाणांहून आरोग्यविषयक माहिती गोळा करुन आरोग्यसेवा बळकटीकरणास मदत होईल. या अभ्यासक्रमात डिजिटल टेक्नॉलॉजी, हॉस्पिटल मॅनेजमेंट, भविष्यात उद्‌भवणारे आजार, एआयचा प्रभावी वापर याचा समावेश करण्यात आला असून आरोग्य अभ्यासकांना अन् संशोधकांनाही याचा फायदा होणार आहे.

कोयटा फाऊंडेशनच्या चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सुरभी गोयल यांनी माहिती दली. डेटा सायन्स, डिजिटल टुल व जागतिक

### दूरस्थ पद्धतीने उद्‌घाटन

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे 'चक्र' व कोयटा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सर्टीफिकेट कोर्स इन डिजिटल हेल्थ' अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन सोमवारी (दि.४) दूरस्थ पध्दतीने करण्यात आले. यावेळी बोलताना कुलगुरु डॉ. कानिटकर म्हणाल्या, केंद्र सरकारच्या ' विकसित भारत' च्या धर्तीवर संशोधन आणि तंत्रज्ञानाचा मेळ घालण्यात आला आहे. डॉक्टर्स आणि तज्ज्ञ तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करु शकतील.

आरोग्य विषयक आव्हाने यांचा अभ्यासक्रमात प्राधान्याने समावेश करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्रति-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, विद्यापीठाच्या 'चक्र'चे प्रभारी ब्रिग. सुबोध मुळगुंद आदी यावेळी उपस्थित होते.

# मेडिकल छात्रों के लिए 'डिजिटल हेल्थ' का दौर

## बोलीं- MUHS कुलपति कानिटकर



■ **नाशिक,** ब्यूरो. महाराष्ट्र स्वास्थ्य विज्ञान विश्वविद्यालय की कुलपति लेफ्टिनेंट जनरल माधुरी कानिटकर ने कहा है कि विश्वविद्यालय का डिजिटल स्वास्थ्य पाठ्यक्रम स्वास्थ्य शिक्षा प्राप्त करने वाले छात्रों के लिए बेहद महत्वपूर्ण साबित होगा. वह विश्वविद्यालय और कोयटा फाउंडेशन द्वारा संयुक्त रूप से आयोजित 'डिजिटल स्वास्थ्य में प्रमाणपत्र पाठ्यक्रम' के उद्घाटन समारोह में बोल रही थीं. कानिटकर ने बताया कि डिजिटल स्वास्थ्य के माध्यम से चिकित्सा के क्षेत्र में एक नया तकनीकी युग शुरू हुआ है. कोयटा फाउंडेशन के सहयोग से तैयार किया गया यह पाठ्यक्रम छात्रों को डिजिटल साक्षरता प्रदान करेगा, जिससे वे प्रौद्योगिकी का प्रभावी उपयोग कर सकेंगे. उन्होंने कहा कि यह पाठ्यक्रम भविष्य के लिए एक आदर्श बनेगा, क्योंकि आने वाले समय में चिकित्सा क्षेत्र पूरी तरह से डिजिटल हो जाएगा. यह पाठ्यक्रम डिजिटल प्रौद्योगिकी, अस्पताल प्रबंधन, उभरती बीमारियों और कृत्रिम बुद्धिमत्ता का प्रभावी उपयोग सिखाएगा. इसका उद्देश्य डॉक्टरों और स्वास्थ्य कर्मियों को डिजिटल युग के लिए तैयार करना है, ताकि वे मरीजों को अधिक सुलभ और प्रभावी सेवाएं दे सकें.

## 'चक्र' और कोयटा फाउंडेशन की पहल

सुरभि गोयल ने बताया कि इस पाठ्यक्रम से छात्रों को रोजगार के कई नए अवसर मिलेंगे. इसमें डेटा विज्ञान, डिजिटल उपकरण और वैश्विक स्वास्थ्य चुनौतियों को भी शामिल किया गया है. इस अवसर पर प्रो-वाइस चांसलर डॉ. मिलिंद निकुंभ, रजिस्ट्रार डॉ. राजेंद्र बंगाल और आईआईटी बॉम्बे के डॉ. रंजीत पंडिहंतेरी सहित कई गणमान्य व्यक्ति उपस्थित थे.

# 'डिजिटल हेल्थ'मुळे आरोग्य सेवा वृद्धिंगत होईल - डॉ. कानिटकर

## आरोग्य विद्यापीठात अभ्यासक्रमाचा शुभारंभ

नाशिक, दि. ५ (सा.वा.) – भविष्याच्या दृष्टीने डिजिटल हेल्थ अभ्यासक्रम महत्त्वपूर्ण आहे. त्याद्वारे आरोग्य सेवा वृद्धिंगत होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधुरी कानिटकर यांनी केले.

विद्यापीठातील 'चक्र' व कोयटा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने डिजिटल हेल्थ अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे, त्याच्या शुभारंभावेळी कुलगुरू डॉ. कानिटकर बोलत होत्या. डिजिटल हेल्थ ही स्वयंचलित प्रक्रिया आहे. विविध ठिकाणांहून आरोग्यविषयक माहिती गोळा करून आरोग्य सेवा वृद्धिंगत करण्यास मदत होईल. या अभ्यासक्रमात डिजिटल तंत्रज्ञान, व्यवस्थापन, भविष्यात उद्‌भवणारे आजार, एआयचा प्रभावी वापर यांचा समावेश आहे. या माध्यमातून डॅक्टर आणि विद्यार्थी डिजिटल युगासाठी सज्ज होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कोयटा फाऊंडेशनच्या सीओओ सुरभी गोयल यांनीही मार्गदर्शन केले. या अभ्यासक्रमामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होतील, आरोग्य व तंत्रज्ञानाच्या संगमामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल, रुग्ण व डॉक्टर यांच्यातील संवाद कौशल्य विकसित होईल, डेटा सायन्स, डिजिटल टूल व जागतिक आरोग्यविषयक आव्हाने यांना यात प्राधान्य आहे, असे त्या म्हणाल्या.

विद्यापीठाचे डिजिटल हेल्थ शिक्षणातील पदार्पण महत्त्वाचे आहे, यामुळे रुग्णांना अधिक सुलभ आणि प्रभावी आरोग्य सेवा पुरवण्यास मदत होईल, असे नॅशनल ॲक्रिडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल ॲण्ड हेल्थकेअर प्रोव्हाइडर्सचे निशांत मेंधे यांनी सांगितले. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, चिन्मय अटले, अविनाश पांडे, आयआयटी मुंबईचे डॉ. रंजीत पंडिहान्तेरी, अविनाश पांडे, मधुरा भोसले आदी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी 'चक्र'चे प्रभारी मुख्य प्रशासकीय अधिकारी ब्रिगेडियर सुबोध मुळगुंद, डॉ. अश्लेषा तावडे, डॉ. सानिया भालेराव यांनी परिश्रम घेतले.

# डिजिटल हेल्थ अभ्यासक्रम सुरू

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे 'चक्र' व कोयटा फाउंडेशन यांच्यातर्फे 'सर्टिफिकेट कोर्स इन डिजिटल हेल्थ' अभ्यासक्रम सुरू झाला.

कुलगुरू डॉ. माधुरी कानिटकर यांच्या हस्ते त्याचे दूरस्थ पद्धतीने उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रति-कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, नॅशनल एक्रिडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल ॲण्ड हेल्थकेअर प्रोव्हाइडर्सच्या सुरभी गोयल, निशांत मेंधे, चिन्मय आयआयटी मुंबईचे डॉ. रंजीत पंडिहान्तेरी आदी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. कानिटकर यांनी यावेळी सांगितले की, डिजिटल हेल्थच्या माध्यमातून तंत्रज्ञानाच्या नव्या पर्वाला प्रारंभ झाला आहे. कोइटा फाउंडेशनच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेला हा अभ्यासक्रम आरोग्य शिक्षणातील विद्यार्थ्यांकरीता अत्यंत महत्वपूर्ण असणार आहे. या अभ्यासक्रमामुळे डॉक्टर्स आणि आरोग्य क्षेत्रातील कार्यरत तज्ज्ञांमध्ये डिजिटल साक्षरता वाढेल आणि ते तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करू शकतील.

# आरोग्य शिक्षणात डिजिटल हेल्थ अभ्यासक्रम महत्वपूर्ण

## मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर यांचे प्रतिपादन

**नाशिक । प्रतिनिधी।**

**आरोग्य शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता विद्यापीठाचा डिजिटल हेल्थ अभ्यासक्रम महत्वपूर्ण राहणार असल्याचे प्रतिपादन विद्यापीठाच्या मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर यांनी केले. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे 'चक्र' व कोयटा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सर्टीफिकेट कोर्स इन डिजिटल हेल्थ' अभ्यासक्रमाचे उद् घाटन दुरस्थ पध्दतीने मा. कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा. प्रति-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, नॅशनल एक्रिडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल ऑण्ड हेल्थकेअर प्रोव्हाडर्सचे) श्रीमती सुरभी गोयल, निशांत मेंधे, चिन्मय अटले, अविनाश पांडे, आय.आय.टी. बॉम्बेचे डॉ. रंजीत पंडिहान्तेरी यांनी, ब्रिग. सुबोध मुळगुंद, डॉ. अक्षेषा तावडे, श्रीमती मधुरा भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.**

यावेळी विद्यापीठाच्या कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर यांनी सांगितले की, डिजिटल हेल्थच्या माध्यमातून तंत्रज्ञानाच्या नव्या पर्वाला प्रारंभ झाला आहे. विद्यापीठाने कोइटा फाऊंडेशनच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेला हा अभ्यासक्रम आरोग्य शिक्षणातील विद्यार्थ्यांकिरीता अत्यंत महत्वपूर्ण असणार आहे. केंद्र सरकारच्या ' विकसित भारत' च्या धर्तीवर संशोधन आणि तंत्रज्ञानाचा मेळ घालण्यात आला आहे. या अभ्यासक्रमामुळे डॉक्टर्स आणि आरोग्य क्षेत्रातील कार्यरत तज्ज्ञांमध्ये डिजिटल साक्षरता वाढेल आणि ते तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करु शकतील. विद्यापीठाचा डिजिटल हेल्थ अभ्यासक्रमाला इतर विद्यापीठासाठी आदर्श असेल असे त्यांनी सांगितले.



त्या पुढे म्हणाल्या की, भविष्यातील वैद्यकीय क्षेत्र हे पूर्णपणे डिजिटल असणार आहे. त्यामुळे आपल्या तरुण डॉक्टरांना आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना डिजिटल हेल्थचे महत्त्व समजावून सांगणारा अभ्यासक्रम असणे ही काळाची गरज आहे. डिजिटल हेल्थ म्हणजे केवळ डेटा एन्ट्रीचे काम नसून, ती एक स्वयंचलित प्रक्रिया आहे जी विविध ठिकाणांहून आरोग्यविषयक माहिती गोळा करुन आरोग्यसेवा वृध्दींगत करण्यास मदत होईल. या अभ्यासक्रमात डिजिटल टेक्नोलॉजी, हॉस्पिटल मॅनेजमेंट, भविष्यात उद् भवणारे आजार, ए.आय. चा प्रभावी वापर याचा समावेश करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमामुळे डॉक्टर आणि विद्यार्थी डिजिटल युगासाठी सज्ज होतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी एन.ए.बी.एच. येथील डिजिटल हेल्थ चे ग्रुप लिडर श्री. अविनाश पांडे यांनी सांगितले की, डिजिटल हेल्थ आपल्या देशात इको-सिस्टम विकसित करणे गरजेचे आहे त्यासाठी विद्यापीठाने सुरु केलेला अभ्यासक्रम उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठाच्या सर्टिफिकेट इन डिजिटल हेल्थ अभ्यासक्रमाच्या उद् घाटनाकरीता विद्यापीठाच्या 'चक्र'चे प्रभारी मुख्य प्रशासकीय अधिकारी ब्रिग. सुबोध मुळगुंद, डॉ. अक्षेषा तावडे, डॉ. सानिया भालेराव यांनी समन्वयन केले.